# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

Speed Post

क्रमांक:-२/एनजीसी/न.अ.प्र.व./सुनावणी/२००८
दिनांक : 16 DEC 2008

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

विषय:- शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून सुरु असलेल्या पदवी संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम/प्रवेशक्षमता बदल करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या सुनावणीबाबत.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या प्रपत्र व मधील संस्थांची सुनावणी दिनांक १२.१२.२००८ रोजी सकाळी १०.०० वाजता मुख्य कार्यालय, मुंबई येथे होणार आहे. सदर सुनावणीसाठी प्रस्तावाचे पॉवर पॉईट प्रेझेंटेशन करण्यासाठी दोन सी.डी. तयार करुन आणाव्यात तसेच सदर प्रेझेंटेशनसाठी ट्रस्टचे अध्यक्ष/सचिव व प्रेझेंटेशन करण्यासाठी एक तांत्रिक माहितगार व्यक्ती यांना उपस्थित रहाण्याच्या सूचना तसेच शैक्षणिक वर्ष २००८-०९ साठी शिक्षण शुल्क निर्धारीत करण्यासाठी शिक्षण शुल्क समितीकडे सादर केलेल्या प्रस्तावाची माहिती आपल्या संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्याच्या सूचना संबंधित संस्थांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

सुनावणीसाठी संस्थांनाअ.भा.तं.शि.परिषदेकडे सादर केलेल्या प्रस्तावासोबत जोडलेल्या खालील कागदपत्रांच्या प्रती घेऊन उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

१. नवीन अभ्यासक्रम/प्रवेशक्षमता वाढ यासाठी नियुक्त केलेला शिक्षकवर्ग/प्रस्तावित शिक्षकवर्ग व त्यांचे समतीपत्र (बायोडेटासह )
२. शिक्षक विद्यार्थी प्रमाण
३. कर्मचा-यांना पाचव्या वेतनआयोगाप्रमाणे देत असल्याबाबतचा पुरावा
४. नवीन अभ्यासक्रम प्रवेशक्षमता बदल यासाठी प्रयोगशाळा व कार्यशाळेच्या निर्माण केलेल्या वाढीव सुविधा (कारपेट एरियासह )
५. संस्थेने आतापर्यंत खरेदी केलेल्या यंत्रसामुग्रीची एकूण किंमत (वर्षनिहाय मागील तीन वर्षांची)
६. नवीन अभ्यासक्रम/प्रवेशक्षमता बदल यासाठी निर्माण केलेल्या संगणकाच्या वाढीव सुविधा
७. नवीन अभ्यासक्रम/प्रवेशक्षमता बदल यासाठी निर्माण केलेल्या ग्रंथालयासाठी वाढीव सुविधा.(टायटल /व्हॉल्युमस/जर्नलसह )

C:\Degre Proposal-09-10\Hearing letter Addl. Amravati.doc.yele

८. नवीन अभ्यासक्रम/प्रवेशक्षमता बदल यासाठी निर्माण केलेल्या ग्रंथालयासाठी वाढीव सुविधा (टायटल /व्हॉल्युमस्/जर्नलसह )

९. नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिटेशन यांनी अभ्यासक्रमाचे ॲक्रिडिटेशन केले असल्यास त्या पत्राची प्रत

१०. शिक्षण शुल्क समितीने शैक्षणिक वर्ष २००८-०९ साठी निर्धारीत केलेल्या शिक्षण शुल्काची प्रत

११. सुरु असलेल्या अभ्यासक्रमासाठी अभ्यासक्रमनिहाय विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षकांची यादी खालील नमुन्यात सादर करावी.

| अ.क्र. | शिक्षकाचे नांव व शैक्षणिक अर्हता | हुद्दा | विद्यापीठाच्या मान्यतापत्राचा क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

१२. सध्या सुरु असलेले अभ्यासक्रम व नवीन अभ्यासक्रम/वाढीव प्रवेशक्षमता यासाठी उपलब्ध असलेले बांधकाम.

| | ॲडमिनिस्ट्रेटिव्ह एरिया | इन्स्ट्रक्शनल एरिया | ॲमिनिटिज (हॉस्टेल व स्टाफ क्वाटर्स वगळून) | एकूण |
|---|---|---|---|---|
| सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमासाठी | | | | |
| नवीन अभ्यासक्रम/वाढीव प्रवेशक्षमता यासाठी | | | | |
| एकूण | | | | |

१३. सध्या सरु असलेल्या अभ्यासक्रमासाठी व नवीन अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेल्या बांधकामासाठी आर्कटेक्टचे प्रमाणपत्र.

१४. विभागीय कार्यालयाकडे जमा केलेल्या तपासणी शुल्काच्या पावतीची प्रत.

( डॉ.डी.एम.मोहिनकर )
उपसंचालक,
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

वि सुविधा.(टाम

# विभागीय कार्यालय, अमरावती

प्रपत्र ब

दिनांक १२/१२/२००८

फार्मसी

| अ.क्र. | कोड नं. | संस्थेचे नाव | प्रस्तावाचे स्वरुप | सुनावणीची वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | ॲडी. पीएच ८ | विद्याभारती शैक्षणिक मंडळाचे, विद्याभारती कॉलेज ऑफ फार्मसी सी.के.नायडू रोड, कॅम्प, अमरावती-४४४ ६०२. | ***नवीन अभ्यासक्रम (पीजी)***<br>१. एम.फार्म. (फार्मास्युटिक्स) १८<br>२. एम.फार्म ( फार्मा केमिस्ट्री) १८ | सकाळी १०.०० वाजता |
| २. | ॲडी. पीएच २२ | जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे, सुधाकरराव नाईक इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, नागपूर रोड, पुसद, यवतमाळ-४४५ २०४. | ***नवीन अभ्यासक्रम (पीजी)***<br>१. एम.फार्म. (फार्माकॉलॉजी) १८ | सकाळी १०.०० वाजता |
| ३. | ॲडी. पीएच २३ | यवतमाल जिल्हा विकास समितीचे, पातालधमाल वाधवानी कॉलेज ऑफ फार्मसी, गिरीजा नगर, धामणगाव रोड, यवतमाळ-४४५ ००१. | ***प्रवेशक्षमता बदल (पीजी)***<br>१. फार्मास्युटिकल केमिस्ट्री १०-१८<br>२. क्वालिटी ॲश्युरन्स १०-१८ | सकाळी १०.०० वाजता |
| ४. | ॲडी. एमबीए-२४ | चैतन्य बहुउद्देशिय संस्थेचे, इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अंजनगाव, बारी रोड, म्हसाळा, अमरावती-४४४ ७२७ | ***प्रवेशक्षमता बदल (पीजी)***<br>१. एमबीए ६०-१२०<br>***नवीन अभ्यासक्रम (पीजी)***<br>१.एमसीए ६० | सकाळी १०.०० वाजता |